VOL- XIII ISSUE- III MARCH 2026 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.589 ISSN 2349-638x

# कृत्रिम बुद्धिमत्तेचा मराठी साहित्यावर होणारा परिणाम

**प्रा. डॉ. कोतमे धिरजकुमार सत्येकाल**
मराठी विभाग प्रमुख,
जयकांती वरिष्ठ महाविद्यालय, लातूर.
ई-मेल - dhiraj.kotme24@gmail.com

**प्रस्तावना :**

आजच्या आधुनिक काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासामुळे मानवी जीवनात मोठे बदल झालेले दिसून येत आहेत. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (Artificial Intelligence) हे एक अतिशय महत्त्वाचे साधन बनले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने संगणक मानवासारखे विचार करू शकते, माहितीचे विश्लेषण करू शकते आणि त्याद्वारे लेखन करू शकते. यामुळेच मराठी साहित्याच्या क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव वाढलेला दिसतो. त्यामुळे साहित्य निर्मितीची प्रक्रिया अधिक जलद व सुलभ झाली आहे. शिक्षण, पत्रकारिता, प्रसारमाध्यमे, लेखन, अनुवाद, कथा, कविता, लेख, निबंध, भाषांतर, समीक्षा इत्यादी साहित्य निर्मिती आणि संशोधन या घटकांवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा चांगला आणि वाईट अशा दोन्ही प्रकारचा परिणाम झालेला आपणास पाहावयास मिळतो.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

खालीलप्रमाणे संशोधनाची उद्दिष्टे ठरविण्यात आलेली आहेत:

- कृत्रिम बुद्धिमत्ता या तंत्रज्ञानाची संकल्पना समजावून सांगणे.
- कृत्रिम बुद्धिमत्ता या नवीन तंत्रज्ञानाचा मराठी साहित्यावर होणारा परिणाम समजून घेणे.
- कृत्रिम बुद्धिमत्तेचे सकारात्मक परिणाम स्पष्ट करणे.
- कृत्रिम बुद्धिमत्तेचे नकारात्मक परिणाम अभ्यासणे.
- कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आगमनानंतर भविष्यातील मराठी साहित्याची दिशा स्पष्ट करणे.

**संशोधन पद्धती :** या संशोधनासाठी खालील संशोधन पद्धती वापरण्यात आलेल्या आहेत. या संशोधनासाठी गुणात्मक व परिमाणात्मक संशोधन, वर्णनात्मक संशोधन, विश्लेषणात्मक संशोधन, ग्रंथ अभ्यास पद्धती, इंटरनेट व लेखांचा अभ्यास, संशोधन निबंधांचा संदर्भ, निरीक्षण पद्धती इत्यादींचा उपयोग करण्यात आलेला आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणकाला मानवी बुद्धीप्रमाणे विचार करण्याची, कल्पकतेची, चातुर्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता देणारे तंत्रज्ञान होय. हे तंत्रज्ञान विकसित झाल्यामुळे मराठी साहित्यावर याचा मोठ्या प्रमाणात प्रभाव पडलेला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने लेखन, संपादन, माहितीचा शोध घेणे, भाषिक विश्लेषण याबरोबरच साहित्य निर्मिती करता येऊ लागलेली आहे.

- **कृत्रिम बुद्धिमत्तेचा मराठी साहित्यावर सकारात्मक परिणाम**

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे मराठी साहित्यावर मोठ्या प्रमाणात सकारात्मक परिणाम झालेला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे आजच्या तंत्रज्ञानाच्या काळातील महत्त्वाचे साधन बनले आहे. या बुद्धिमत्तेमुळे संगणकाला मानवी बुद्धीप्रमाणे विचार करण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता विकसित झाली आहे. या कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे अनुवाद, संशोधन, संपादन, माहिती शोध, भाषिक विश्लेषण आणि प्रसार यामध्ये अधिक विकास होत आहे. यामुळे साहित्य, शिक्षण व पत्रकारिता या क्षेत्रांमध्ये विकास झालेला आहे. या कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य आणि मर्यादित प्रमाणात वापर केल्यास मराठी साहित्यातील सर्जनशीलता आणि गुणवत्ता टिकून राहील. त्या बुद्धिमत्तेचा साहित्याच्या निर्मितीमध्ये सहायक साधन म्हणून वापरणे गरजेचे आहे.

**१) साहित्य निर्मिती सोपी**

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे लेखकाला कथा, कविता, निबंध, लेख, भाषण इत्यादी प्रकारचे साहित्य लेखन करणे सोपे झाले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे लेखकाला नवीन नवीन कल्पना

मिळत आहेत. त्यामुळे त्याच्या लेखनाला वेग आलेला आहे व लेखन काहीसे सोपे झालेले आहे. या तंत्रज्ञानामुळे संशोधन आणि माहिती गोळा करणे सुलभ झालेले आहे. यामुळे मराठी साहित्य निर्मिती अधिक वेगाने आणि व्यापक मोठ्या प्रमाणात होताना दिसते.

**२) अनुवाद व भाषांतर सोपी**

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे इंग्रजी, हिंदी व इतर भारतीय व जागतिक भाषेतील साहित्य उपलब्ध होत आहे. त्या साहित्याचे मराठी भाषेमध्ये अनुवाद करणे सोपे झाले आहे.

या तंत्रज्ञानामुळे जागतिक पातळीवरील साहित्याचे मराठीतील भाषांतर उपलब्ध होत आहे. या तंत्रज्ञानामुळे मराठीतील सर्वच साहित्य इतर सर्व भारतीय व जागतिक भाषेमध्ये अनुवादित झालेले आहे. त्यामुळे वाचकांना त्यांच्या आवडीनुसार व गरजेनुसार विविध विषयाची व भाषेची माहिती उपलब्ध होत आहे. त्यामुळे भाषांतराच्या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

**३) डिजिटल साहित्याचा विकास**

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे मराठी साहित्य डिजिटल स्वरूपात उपलब्ध होत आहे. या तंत्रज्ञानामुळे ई-बुक, ब्लॉग, वेबसाइट, सोशल मीडिया, ऑनलाइन मासिके इत्यादी साधनांचा मोठ्या प्रमाणात विकास झालेला आहे. यामुळे मराठी साहित्य डिजिटल स्वरूपात उपलब्ध होत आहे. यामुळे मराठी साहित्य जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचत आहे. यामुळे वाचकांसाठी साहित्य सहज उपलब्ध झाल्यामुळे लोकांमध्ये वाचनाची सवय वाढलेली दिसते.

**४) नवोदित लेखकांना संधी**

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे नवोदित लेखकांना मराठी साहित्याच्या क्षेत्रात नवनवीन संधी उपलब्ध झालेल्या आहेत. नवीन लेखकांना लेखनाची दिशा मिळत आहे. या तंत्रज्ञानामुळे त्यांची लेखन शैली सुधारत आहे. त्यांच्यातील कल्पनेला, सर्जनशीलतेला संधी मिळत आहे. लेखन करताना लेखकाला व्याकरणातील चुका दुरुस्त करता येत आहेत. त्यांना त्यांच्या कल्पना विकसित करता येत आहेत. यामुळे नवोदित लेखक मराठी साहित्याच्या क्षेत्रात निर्मितीसाठी पुढे येत आहेत. यामुळे साहित्य लेखन प्रक्रिया सुलभ झालेली आहे.

**५) संशोधन आणि साहित्य अभ्यासात मदत**

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे मराठी साहित्याचा अभ्यास करण्यासाठी, संशोधन करण्यासाठी आणि केलेल्या संशोधन व विश्लेषणासाठी या तंत्रज्ञानाची मोठ्या प्रमाणात मदत झालेली आहे. यामुळे अभ्यास, संशोधन व विश्लेषण करणे सुलभ झाले आहे. या तंत्रज्ञानामुळे विद्यार्थ्यांना, संशोधकाला कोणत्याही विषयावरील माहिती सहज उपलब्ध होत आहे. त्यांना आवश्यक असलेली पुस्तके, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, दैनिके सहज उपलब्ध होत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना व संशोधकांना त्याचा अभ्यास करून विश्लेषण करणे सोपे झालेले आहे. यामुळे या क्षेत्रामध्ये विद्यार्थी व संशोधकांना कृत्रिम बुद्धिमत्तेची या कामासाठी मोठी मदत होत आहे.

**मराठी साहित्यावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा नकारात्मक परिणाम**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा मराठी साहित्यावर काही प्रमाणात नकारात्मक परिणाम होत असलेला दिसून येत आहे. या तंत्रज्ञानावर अवलंबून राहिल्यामुळे लेखकाची मानवी कल्पनाशक्ती कमी होऊ लागलेली आहे. लेखनातून लेखकाची भावना, विचार, कल्पकता, सर्जनशीलता व्यक्त होत असते, त्यावर नकारात्मक परिणाम होऊ लागलेला आहे. लेखनातील नवीन विचार, गोष्टी, प्रयोग, भावना, सर्जनशीलता इत्यादी कमी होऊन कृत्रिम लेखन होण्याची शक्यता आहे. यामुळे लेखनामध्ये अनुभव व भावना कमी होत जातील. या तंत्रज्ञानामुळे मानवी भावनांचा ऱ्हास निर्माण होईल व भावनांची खोली कमी होऊ लागेल. यामुळे लेखक नवीन लेखन निर्मिती करण्याऐवजी या तंत्रज्ञानावर अवलंबून राहील व तशीच सवय लागेल. लेखन ही प्रक्रिया आहे, कल्पकता आहे, त्याचा वापर केल्यामुळे लेखन फुलते व विकसित होते; ही सर्जनशीलता कमी होऊ शकते. या तंत्रज्ञानामुळे लेखकामध्ये असलेली सर्जनशीलता व लेखन शैली कमी होण्याची शक्यता आहे.

त्याबरोबरच नवीन लेखक, विद्यार्थी व संशोधक नवीन काही न करता कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करून त्यावरच अवलंबून राहतील. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे साहित्यातील मानवी भावना पुसट होऊन कृत्रिमता वाढलेली दिसून येईल. या तंत्रज्ञानाचा लेखनाच्या रोजगारावर मोठ्या प्रमाणात परिणाम होऊन मानवी लेखनाची गरज उरणार नाही, त्यामुळे त्यांच्या रोजगारावरही परिणाम दिसून येईल. या तंत्रज्ञानामुळे डिजिटल साहित्य सहज उपलब्ध झाल्यामुळे कॉपी-पेस्ट करून तयार मजकूर वापरण्याची मानसिकता वाढू

लागेल व यामुळे साहित्याचा चोरीचा (साहित्य चोरी) धोका मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ शकतो.

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे कथा, कविता, लेख तयार मिळतात. त्यामुळे लेखक स्वतःची कल्पनाशक्ती न वापरता या तंत्रज्ञानावर अवलंबून राहिल्यामुळे मानवाची सृजनशीलता व त्यातील मौलिक विचार कमी होण्याची शक्यता आहे. यामुळे सामान्य व ठराविक आराखड्यातील साहित्य निर्माण होईल. त्यातील भावना, विचार, जीवनातील खोल अनुभव व वास्तव असणार नाही. त्यामुळे या तंत्रज्ञानाच्या आधारे निर्माण झालेले साहित्य दर्जेदार नसेल. त्या साहित्यातील भाषेमध्ये बारकावा येणार नाही, वाक्यात बोलीभाषा, म्हणी, अलंकार योग्य पद्धतीने येणार नाहीत. या लेखनात जीवनातील अनुभव, संघर्ष, भावना येणार नाहीत. त्यामुळे हे साहित्य वरवरचे वाटेल. यातील नाविन्य व गोडी नष्ट होईल आणि त्यामुळे नवीन लेखकांना आपली वेगळी ओळख निर्माण करता येणार नाही.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा परिणाम वाचन संस्कृतीवर होईल. या तंत्रज्ञानामुळे लगेच उत्तर मिळाल्यामुळे लोक सखोल वाचणार नाहीत. त्यामुळे पुस्तके वाचण्याची सवय कमी होईल व लोकांची साहित्यातील गोडी कमी होईल. यातून निर्माण होणारी समृद्ध, अनुभवी, विचारी वाचक पीढी कमी होत जाईल व कृत्रिम व वरवरचे वाचक तयार होण्याचा धोका निर्माण होईल.

कृत्रिम बुद्धिमत्ता हे अतिशय महत्त्वाचे आणि शक्तिशाली साधन आहे, पण त्याचा अतिरेकी वापर केल्यामुळे मराठी साहित्याच्या मौलिकतेवर, गुणवत्तेवर आणि सांस्कृतिक मूल्य, परंपरा, स्थानिक संदर्भ यांच्यावर नकारात्मक परिणाम होईल. त्यातील सांस्कृतिक गाभा कमी होऊन मूल्यहीन, वरवरचे साहित्य निर्माण होण्याचा धोका आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानाचा वापर सहाय्यक म्हणून केला पाहिजे. यावर पूर्णपणे अवलंबून राहणे चुकीचे ठरणार आहे.

- **भविष्यातील मराठी साहित्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता**

भविष्यातील मराठी साहित्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचे नाते अत्यंत महत्त्वाचे आणि नवीन दिशा घडविणारे असेल. हे नाते सकारात्मक व काही प्रमाणात नकारात्मक परिणाम घडविणारे असेल. तरीही भविष्यातील नवीन साहित्य हे मानवी सृजनशीलतेच्या बुद्धिमत्तेच्या सहाय्याने निर्माण होणे गरजेचे आहे. या तंत्रज्ञानामुळे लेखकांना समन्वय होऊन नवीन कल्पना, शैली मिळेल परंतु मानवी भावनेची खोली गाठणारे साहित्य निर्माण होण्याची गरज आहे. या तंत्रज्ञानाचा सहाय्यक म्हणून वापर केल्यास लेखन जलद व सोपे होईल. संपादन करताना, शुद्धलेखनात सहज सुधारणा जमतील. यामुळे नवीन लेखकांना मार्गदर्शन मिळून लेखनाची गती वाढेल, पण त्याबरोबरच त्यातील मौलिक विचार असणे गरजेचे आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून भविष्यात मराठी भाषा व साहित्याचे जतन व प्रसार करण्यात मदत होईल. यामुळे दुर्मीळ साहित्याचे डिजिटल स्वरूप तयार होईल व या भाषांतरामुळे मराठी साहित्य जागतिक पातळीवर पोहोचण्यासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग होईल. यामुळे मराठी भाषेचा विस्तार होण्याची मोठी संधी निर्माण होईल. या तंत्रज्ञानामुळे भविष्यात वाचकांच्या आवडीचे साहित्य निर्माण होईल. त्यामुळे त्यांना वाचनाची सवय लागेल व ती वाढेल. त्यातील साहित्यामध्ये परंपरा, विचार, भावना टिकल्या पाहिजेत व यातून मौलिक लेखनाला प्राधान्य दिले जाणे महत्त्वाचे आहे. या तंत्रज्ञानामुळे चांगल्या दर्जाचे साहित्य वाढू शकते. संशोधनावर आधारित साहित्यामध्ये वाढ होणे महत्त्वाचे आहे. या तंत्रज्ञानाच्या वापराने मूळ लेखकाचे हक्क धोक्यात येऊ शकतात. भविष्यातील मराठी साहित्य निर्मितीवर या कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव दोन्ही बाजूंनी असेल. या तंत्रज्ञानामुळे जागतिक पातळीवर हे साहित्य पोहोचेल, त्याचबरोबर त्यातील सृजनशीलता, कल्पकता, मौलिकता, भावनात्मक आणि नैतिक मूल्य टिकवण्याचे आव्हान लेखकासमोर असेल.

**निष्कर्ष** –

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे आजच्या मराठी साहित्य क्षेत्रात नवनवीन संधी निर्माण झाल्या आहेत. साहित्य निर्मिती, अनुवाद, संशोधन आणि प्रसार यामध्ये या तंत्रज्ञानामुळे मोठा विकास होत आहे. परंतु या तंत्रज्ञानाचा उपयोग योग्य पद्धतीने करणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे साहित्य निर्मितीचे साधन आहे, तो पर्याय नाही. म्हणून त्याचा उपयोग फक्त सहाय्यक म्हणून केला जावा. तरच मराठी साहित्यातील कल्पकता, जीवनमूल्य, सर्जनशीलता, भावनिकता, त्यातील मौलिकता, नैतिक मूल्य टिकून राहतील आणि त्यामुळेच मराठी साहित्याचा विकास होऊन कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सर्जनशीलता यांचा समन्वय साधता येईल.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. साहित्याची निर्मिती प्रक्रिया - डॉ. आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

२. साहित्याचा अन्वयार्थ - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

३. साहित्याची भाषा - डॉ. भालचंद्र नेमाडे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

४. साहित्य समीक्षा - डॉ. गंगाधर पाटील, मौज प्रकाशन गृह.

५. आधुनिक मराठी साहित्य - डॉ. सुभाष भिडे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

६. इंटरनेट स्त्रोत - Google Scholar, Research Articles, Journals.